महत्त्वाचे

प्रवासी टेम्पोवर टँकर उलटला; ९ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली:

उत्तरप्रदेशमधून एक भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या नादात एका टँकर आणि प्रवाशांनी भरलेल्या टेम्पोमध्ये हा भीषण अपघात झाला असून यामध्ये ९ जणांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्देवी घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून अपघातात जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, खापलनगर ते मोहनगंज जवळ लालगंजकडून गॅसचा टँकर येत होता. तर प्रतापगडकडून एक टेम्पो जेठवाड्याकडे जात होता. यावेळी रायबरेली-जौनपूर महामार्गावर रायजू विक्रमपूरजवळ दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात टँकर आणि टेम्पोमध्ये भीषण धडक झाली. या धडकेनंतर टेम्पो पलटी झाला. ही धडक इतकी भीषण होती की टेम्पोमधील १६ जणांपैकी सात जणांचा जागीच मृत्यू झाला. तर दोघांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या धक्कादायक घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती. यावेळी स्थानिकांनी मदत करत अपघातातील जखमींना रुग्णालयात दाखल केले.

कृषी पदवी अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ

वर्धा : राज्यातील कृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील नऊ अभ्यासक्रमांत प्रवेश घेण्यासाठी ९ जुलै ही अंतिम मुदत होती. आता त्यासाठी आणखी सात दिवस देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना २६ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल. राज्य सामायिक प्रवेश कक्षातर्फे ही प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या नऊ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी १२ हजार ६९० जागा राज्यात उपलब्ध आहेत. आता अर्ज सादर करण्यास १६ जुलै, तात्पुरती गुणवत्ता यादी २० जुलै, हरकती व तक्रारी २१ ते २३ जुलै, हरकतींची यादी प्रसिद्ध २५ जुलै, अंतिम गुणवत्ता यादी २७ जुलै, पहिल्या फेरीची निवड यादी २९ जुलै असा कार्यक्रम आहे.

रिक्षाचालकाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

मुंबई : देवनार येथे रिक्षातून जाणाऱ्या एका १४ वर्षांच्या मुलीचा रिक्षाचालक आणि त्याच्या साथीदाराने विनयभंग केल्याची घटना घडली. याप्रकरणी देवनार पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. मानखुर्द परिसरात राहणारी पीडित मुलगी आठ दिवसांपूर्वी देवनार परिसरात वास्तव्यास असलेल्या आजी-आजोबांना जेवण देण्यासाठी गेली होती. जेवण दिल्यानंतर ती रिक्षाने घरी परत येत होती. त्यावेळी आरोपी रिक्षाचालकाने मुलीला चेंबूर - वाशीनाका परिसरात नेले. या ठिकाणी रिक्षाचालक आणि त्याच्या साथीदाराने मुलीला निर्जन ठिकाणी नेऊन तिचा विनयभंग केला. मात्र संधी साधून मुलीने आरोपींच्या तावडीतून सुटका करून घर गाठले. या घटनेनंतर घाबरलेली पीडित मुलगी घरात गप्प असायची. त्यामुळे कुटुंबियांनी तिला विश्वासात घेऊन चौकशी केली असता तिने घडलेला प्रकार त्यांना सांगितला. तिच्या कुटुंबियांनी शनिवारी याप्रकरणी देवनार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

नवले पुलावर पुन्हा अपघात; अवजड कंटेनर उलटला

पुणे: मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर अवजड कंटेनर सोमवारी सकाळी उलटला. सुदैवाने अपघातात कोणी जखमी झाले नाही. अपघातानंतर बाह्यवळण मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मुंबईहून साताऱ्याकडे निघालेला अवजड कंटेनर बाह्यवळण मार्गावर नवले पुलाजवळ सोमवारी सकाळी दहाच्या सुमारास उलटला. कंटेनर उलटल्यानंतर वाहतूक विस्कळीत झाली. अपघाताची माहिती मिळताच तातडीने सिंहगड रस्ता पोलीस ठाणे, तसेच वाहतूक शाखेतील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अवजड कंटेनरचे ब्रेक निकामी झाल्याने अपघात झाल्याची माहिती कंटेनरचालकाने दिली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. पोलिसांनी अवजड कंटेरनर हलविण्यासाठी क्रेन मागविली. क्रेनच्या सहायाने कंटेनर हलविण्यात आला.

रूग्णवाहिकेने चिरडलेल्या वृध्दाचा उपचारादरम्यान मृत्यू

ओतूर : जुन्नर येथील बसस्थानकावर रूग्णवाहिका वळवताना रूग्णवाहिकेखाली एक वृध्द चिरडला गेला असून त्याचा उपचारादरम्यान पुणे येथे मृत्य झाला आहे. हा अपघात १ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजे दरम्यान ओतूर बसस्थानकात झाला असून या अपघातात रज्जाक मगन मुंढे (६५, रा.ओतूर, ता. जुन्नर) मयत झाले आहेत. ओतूर पोलिसांनी रूग्णवाहिका चालक कुणाल तुकाराम डुंबरे (रा. डुंबरवाडी, ता. जुन्नर) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. सदर अपघातात बाबत जमिर बाबुलाल मुंढे (रा. घोडेगाव, ता. आंबेगाव) यांनी ओतूर पालिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कार्यक्रमात आमचाही झेंडा लावा : अजित पवार

राष्ट्रवादीचा झेंडा अंगवळणी पडायला वेळ लागतोय : एकनाथ शिंदे

राष्ट्रवादीचेही झेंडे लावा, दादांची मागणी

शासन आपल्या दारी कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार धुळ्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांना म्हणाले, आता तीन पक्षांचं सरकार आहे, इथे दोन पक्षांचे झेंडे लावले आहेत तसे आता राष्ट्रवादीचे झेंडे लावायला सुरुवात करा, अशी विनंती मी तुम्हाला करतो.

दादा तुमची मागणी पूर्ण करू- शिंदे

या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं भाषण झाल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं भाषण झालं. या भाषणात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तुमची मागणी नक्कीच पूर्ण केली जाईल असे म्हणत अजित पवारांना आश्वस्त केलं.

धुळे : प्रतिनिधी

सकारच्या 'शासन आपल्या दारी' हा कार्यक्रम आज धुळे शहरात पार पडला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात झेंड्यावरुन अजित पवार यांनी केलेलं वक्तव्य सध्या चर्चेत आले आहे. तर भरसभेतच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील अजित पवार यांना प्रत्युत्तर देत तुमची मागणी मान्य केली जाईल, असा विश्वास दिला. त्यामुळे सभास्थानी हास्या पिकल्याचे देखील पाहायला मिळाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, गेल्या वर्षी आपल्या युतीचं सरकार आलं, हे सरकार आता एक वर्षाचं झालं आहे. आपल्या या विकासाच्या कामाला साथ देण्यासाठी अजित पवार आणि त्यांचे सहकारी आमदार आपल्याबरोबर आले आहेत. आपली ताकद आता वाढली आहे. परंतु दादा आमची युती २५ वर्षांची आहे. युती असल्यामुळे शिवसेनेसह भाजपाचे झेंडे लागलेले आहेत. तुमचा राष्ट्रवादीचा झेंडा अंगवळणी पडायला वेळ लागतोय. परंतु पुढच्या कार्यक्रमात तिन्ही पक्षांचे झेंडे नक्की लागतील. शेवटी हा आपला विकासाचा त्रिशूळ आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले हा आपला विकासाचा त्रिशूळ आहे. या त्रिशूळामुळे समोरच्या विरोधी पक्षाला धडकी भरली आहे. त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. काय करावं ते सुचेनासं झालंय. बघावं तिकडे आपल्या सरकारला पाठिंबा देणारी जनता या राज्यात पाहायला मिळत आहे. विरोधी पक्षाची ताकद अगदी कमजोर झाली आहे. ते फक्त आरोप प्रत्यारोप करत आहेत. मोदींवर आरोप करणं हा त्यांचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे.

समृद्धी महामार्गावर अपघात

दुभाजकाला धडकून कारचा चुराडा

नागपूर:

समृद्धी महामार्गवर पुन्हा एक भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. नागपूर येथून मुंबईकडे जाणाऱ्या कारचा समृद्धी महामार्गावर चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात झाला आहे. वाशिम जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यात झालेल्या या अपघातात ही कार कार दुभाजकाला चार जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे.

कार दुभाजकाला धडकून अपघात झाल्याची घटना वाशिम जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील चॅनल नंबर २३५ वर घडला आहे. या धडकेत कार मधील चार जण जखमी झाले आहेत. ही धडक इतकी भयंकर होती की, गाडीच्या समोरील भागाचा चुराडा झाला आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेले राजेश पांडे (३५ वर्ष) यांच्या डोक्याला गंभीर दुखापत व पायाला किरकोळ दुखापत झाली तर आकाश नागदेव (४२ वर्ष) हाताला व पायाला किरकोळ दुखापत झाली आहे.

दरम्यान, आज वसई पूर्वेच्या फादरवाडी येथे एका भरधाव इनोवा कार आणि दुचाकीमध्ये हा अपघात झाला असून इनोव्हाच्या धडकेत दोन दुचाकी स्वार तरुण गंभीर जखमी झाले आहेत. या संपूर्ण अपघाताचा थरार सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. वसई पूर्वेच्या फादरवाडी येथे एका भरधाव इनोवा कारच्या धडकेत दोन दुचाकी स्वार तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. आज पहाटेच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. दुचाकीवरील दोन तरुण दुचाकीत पेट्रोल भरून तुंगारेश्वर मंदिराकडे जात होते.

भाजपा पदाधिकाऱ्यांनी लावला दोन लाखांचा चुना

शहापूर:

प्रतिनिधी .ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील भाजपाच्या पदाधिकाऱ्याने कृपया आयपीएस अधिकाऱ्याच्या संगनमताने नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून एका काँग्रेस पदाधिकाऱ्याला तब्बल दोन लाखाचा चुना लावल्याची घटना समोर आली आहे.

मुरबाड येथील टोकवडा गावाचे हद्दीत घडलेली घटना आहे टोकवडे ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष बबन पवार (रा. मुरबाड) आणि जगदीश बबन वाळिंबे (रा. शिरगाव, शहापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या दोन्ही आरोपींची नावे आहेत. तर मधुकर देसले वय ५६ टोकावडे असे तक्रारदार काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचे नाव आहे. विशेष म्हणजे संतोष पवार हा ठाणे जिल्हा भाजपा कामगार आघाडीचा पदाधिकारी असून जगदीश वाळंबे हा तोतया आयपीएस अधिकारी असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले . संतोष पवार यांचे मुरबाड येथे तहसील कार्यालयासमोर झेरॉक्सचे दुकान आहे येथेच मधुकर देसले यांची त्याच्याशी ओळख झाली आरोपी संतोषने देसले यांच्याकडे पत्नीचे गहाण ठेवलेले सोन्यासाठी दोन लाख रुपयाची मागणी केली ओळख असल्याने आरोपीवर विश्वास ठेवून दिसले. यांनी दोन लाख रुपये आरोपी संतोषला दिले. त्याच दिवशी संध्याकाळी आरोपी संतोष देसले यांनी आरोग्य विभागात नोकरीसाठी जाहिरात निघाले आहेत जर तुमच्या कोणत्या नातेवाईकाला नोकरीला लावायचे असेल तर मला सांगा माझा नातू एक मोठा आयपीएस अधिकारी आहे नोकरीला लावण्याचे काम करून देईल त्यानुसार देसले यांनी त्यांच्या नातेवाईकाचा अर्ज भरला नोकरीचे काम होणार का असे विचारले असता आरोपी संतोषने होकार दिला दिला. मात्र नोकरी न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्यचे लक्षात येताच पीडितांनी पोलिसांकडे आपबिती कथन केली.

जायकवाडी धरणातील पाणी आरक्षित करण्याचा निर्णय

छत्रपती संभाजीनगर:

जून महिन्यात पावसाने पाठ फिरवली असून, जुलै महिन्यात देखील अपेक्षित पाऊस पडला नसल्याने मराठवाड्यातील धरणातील पाणीसाठी कमी झाला आहे. या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील नागरिकांची तहाण भागवण्यासाठी जायवाडी धरणातील पाणी आरक्षीत करण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्यामुळे आता जायकवाडीतून शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यात येणार नाही.

सध्या मराठवाड्यातील एकूण ११ प्रमुख धरणात ३३.४८ टक्के पाणीसाठी शिल्लक आहे. तर जायकवाडी धारणात केवळ २६.९३ टक्केच पाणीसाठी शिल्लक आहे. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. मराठवाड्यात यंदा जून महिन्यात पावसाने पूर्णपणे पाठ फिरवली आहे. त्यात जूनच्या सुरुवातीला जायकवाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही हवा तसा पाऊस बरसलेला नाही. त्यामुळे पाण्याची पातळी खोल गेली आहे. गेल्या वर्षीची तुलना केल्यास समान कालावधीत जायकवाडी धरणात ४४.०६ टक्के एवढा जलसाठा होता. यंदा मात्र, त्यात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

टायटल व्हेरीफिकेशन जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **मौजे चुंचाळे** या गांवचे शिवारातील **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील बिनशेती मिळकत यांसी **गट नं.१०३/१क/१** यांसी अंतीम ले-आऊट मधील **प्लॉट नं.१८ व १९** यांसी प्रत्येकी क्षेत्र ६३-९९ चौ.मी. यांसी **सिटी सर्व्हे नं.४४७८** ह्या मिळकती पैकी **प्लॉट नं.१९** ह्या मिळकतींवर बांधण्यात आलेल्या रो-हाऊसेस मधील **रो-हाऊस नं.०२** ही मिळकत यांसी **प्लॉटचे क्षेत्र ६३-९९ चौ.मी.** यांसी **बांधीव क्षेत्र ३३-३४ चौ.मी.** ही मिळकत **श्री.शिवाजी गोरखनाथ कटके** यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीतील मिळकत आहे. सदर मिळकत ही संपूर्णपणे निर्वेध व बोजारहीत असल्याचे सांगुन **श्री.शिवाजी गोरखनाथ कटके** यांनी त्यांचे कर्जाकरीता **श्री संत सदगुरू नारायणगिरी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या.**, कार्यालय पत्ता, जाधव संकुल, अशोकनगर, सातपुर, नाशिक यांना सदर मिळकत गहाण देण्याचे ठरविले आहे. तसेच सदर कर्जाकरीता **श्री.भगवान सहादु गायकवाड व श्री.अनंत बाळकृष्ण परदेशी हे जामीनदार** आहेत. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध,बँक बोजा,लिज, लिन, गहाण, सोसायटी कर्ज, दान, मृत्युपत्र, बक्षिसपत्र, साठेखत, खरेदीखत इ. असल्यास त्या व्यक्तिंनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे आत** आपली हरकत आमचेकडे लेखी व साक्षांकीत कागदोपत्री पुराव्यासह द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत संपुर्णपणे निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजुन गहाणखताचा दस्त केला जाईल. मुदतीनंतर व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.१०/०७/२०२३.

श्री.रुपेश सुभाष फरताळे,ॲडव्होकेट
दुसरा मजला,श्रीमहादेव कॉम्प्लेक्स,जळगांव जनता बँकेचे वर,सिबीएस.,नाशिक.मो.९८२२९८७१९५

नि.
प्रोसेस जमा
ॲड.अजित पंडीतराव पाटील

जाहीर नोटीस

दिवाणी चौकशी अर्ज नं.३१५/२०२३
नाशिक येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,नाशिक, यांचे कोर्टात ....
सुनिता सुर्यनारायण अवस्थी, रा. गुलमोहर बंगला,) **अर्जदार**
४८०/टी-६, श्रीनगर, जुना गंगापुर नाका, नाशिक-१३)
विरूद्ध
कोणीही नाही) **सामनेवाले**

ज्याअर्थी **सुनिता सुर्यनारायण अवस्थी** यांचे वडील **कै. सुर्यनारायण अवस्थी** यांचे नावावर... **अ)** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **सर्व्हे नं.६७९/१अ/१२, प्लॉट नं.७** यांसी **फायनल प्लॉट नं.४०८** यांसी क्षेत्र ८४६-९९ चौ.मी. **ब)** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **सिटी सर्व्हे नं.२६०२/अ** यांसी **क्षेत्र १६७-२ चौ.मी. क)** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **सिटी सर्व्हे नं.२०१३** यांसी **क्षेत्र ९२ चौ.मी.** ही संपुर्ण मिळकत.

उपरोक्त नमुद मिळकती अर्जदार यांना मिळणेकामी मयत कै.सुर्यनारायण अवस्थी यांचे वारस म्हणून अर्जदार यांच्या नावाने बॉम्बे रेग्युलेशन VIII १८२७ अन्वये वारस दाखला (Heirship Certificate) मिळणेबाबत प्रस्तुत अर्ज या मे.कोर्टात दाखल केला आहे त्याअर्थी अर्जदार यांना कै.सुर्यनारायण अवस्थी यांचे वारस म्हणून वारस दाखला देण्याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत **दि.११/०८/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता** या मे.कोर्टात स्वत: अगर वकील/प्रतिनिधींमार्फत समक्ष नोंदवावी. याप्रमाणे नेमले तारखेस कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांना त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.१०/०७/२०२३.

सही/- **कामगिरी लिपिक,** दिवाणी न्यायालय
कोर्टाचा शिक्का
सही/- **अधिक्षक,** दिवाणी न्यायालय

शिक्षकांसाठी एक दिवसीय उजळणी वर्गाचे आयोजन

नाशिक : प्रतिनिधी

जिल्हा परिषदेचा प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग आणि नाशिक भारत स्काउट्स आणि गाईड जिल्हा संस्था व प्रशिक्षण केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठी (दि.१३ ते दि.२०) या कालावधीत एक दिवसीय तालुकानिहाय उजळणी वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

या तालुका निहाय उजळणी वर्गासाठी जिल्ह्यातील शाळांतील शिक्षक- शिक्षिकांनी भारत स्काऊट गाईड कार्यालयाकडून शाळांना प्राप्त नियोजनानुसार उपस्थित राहण्याचे आवाहन नाशिक भारत स्काउट गाईडचे मुख्य आयुक्त तथा प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, स्काउट आयुक्त तथा माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील यांनी केले आहे.

शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या या तालुकानिहाय उजळणी वर्गात स्काउट गाईड अभ्यासक्रम, समुदाय विकास कार्यक्रम, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील उपक्रम, ऑनलाईन युनिट नोंदणी याबाबत मार्गदर्शन केले जाणार असल्याची माहिती नाशिक भारत स्काउट गाईड कार्यालयाचे संघटक श्रीवास मुरकुटे, कविता वाघ यांनी दिली.

दि.१३ जुलै रोजी नाशिक भारत स्काउट गाईड कार्यालय येथे नाशिक, पेठ या तालुक्यांसाठी, दि.१४ जुलै रोजी नाशिक भारत स्काउट गाईड कार्यालय येथे त्र्यंबकेश्वर, इगतपुरी या तालुक्यांसाठी, दि.१५ जुलै रोजी के.आर.टी.हायस्कूल, वणी येथे दिंडोरी, सुरगाणा या तालुक्यांसाठी, दि.१७ जुलै रोजी जी.एम.डी.आर्टस, बी,डब्ल्यू कॉमर्स आणि सायन्स कॉलेज येथे सिन्नर तालुक्यासाठी, दि.१८ जुलै रोजी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, विंचूर, ता. निफाड येथे निफाड, चांदवड आणि येवला या तालुक्यांसाठी, दि.१९ जुलै रोजी या.ना.जाधव विद्यालय, मालेगाव येथे मालेगाव आणि नांदगाव या तालुक्यांसाठी तर दि.२० जुलै रोजी मराठा हायस्कूल, सटाणा, ता.सटाणा येथे सटाणा, देवळा आणि कळवण या तालुक्यांसाठी उजळणी वर्गाचे आयोजन सकाळी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत करण्यात आले आहे.

लष्करी जवानाला मारहाण करुन लुटले

पुणे: लष्करातील जवानाला मारहाण करुन लुटल्याची घटना घोरपडीतील सोपानबाग परिसरात घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.याबाबत परशुराम बसप्पा नगराळे (वय ३९) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नगराळे हे आर्मी स्पोर्टस इन्स्टिट्यूटमध्ये चालक आहेत. ते घोरपडीतील सोपानबाग परिसरातून सायकलवरुन निघाले होते. त्या वेळी चोरट्यांनी सुरक्षारक्षक मोहित साकेत याला अडवून मारहाण करण्यास सुरुवात केली. चोरट्यांनी साकेतला धमकावून लुटण्याचा प्रयत्न केला.

देवळाली रोटरी क्लबचे समाजकार्य ही देशसेवाच : ब्रिगेडियर ए. रागेश

देवळाली कॅम्प : वार्ताहर

लष्करी अधिकारी व जवान हे आपल्या सेवाकाळात पूर्णपणे देशसेवा करतात. त्याचप्रमाणे समाजात गेल्या बहात्तर वर्षांपासून देवळाली रोटरी क्लब करत असलेले समाजकार्य हे एकप्रकारे देशसेवा करत आहे. यामध्ये अनेक माजी लष्करी अधिकारी सहभागी असल्याचा अभिमान असल्याचे प्रतिपादन स्कुल ऑफ आर्टिलरीचे कमांडन्ट ब्रिगेडियर ए. रागेश यांनी केले.

येथील देवळाली रोटरी क्लबचा ७३ वा पदग्रहण सोहळा नाशिक क्लबच्या सभागृहात पार पडला.या पदग्रहण सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून ब्रिगेडियर ए. राजेश मार्गदर्शन करत होते. यावेळी मंचावर असिस्टंट गव्हर्नर उदय साळी, मावळते अध्यक्ष डॉ. अनिल कानडे, मावळत्या सचिव प्रा. सुनीता आडके, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा मनीषा तोंडे मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्रा.सुनीता आडके यांनी २०२२-२३ या वर्षीचा अहवाल वाचन केले. 'क्रिएट अ होम ' हि या वर्षासाठीची संकल्पना रोटरी क्लबने अंगिकारली आहे. पदग्रहण समारंभात डॉ.अनिल कानडे यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष राजू कटारे यांच्याकडे चार्टर सुपूर्द करत अध्यक्षपदाची सूत्रे तर प्रा. आडके यांनी डॉ.पुष्कर जोशी यांच्याकडे सचिव पदाची सूत्रे प्रदान केली. या क्लबच्या उर्वरित कार्यकारणीत उपाध्यक्षपदी प्रा.सुनीता आडके, सचिव- डॉ पुष्कर जोशी, सहसचिव- अलका स्वादी, क्लब एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी- मुरली राघवन, खजिनदार - डॉ,अनिल कानडे, सार्जंट ऑफ आर्म -से.नि.कर्नल रॉनी वानिया, कम्युनिटी सर्व्हिसेस- जयरामन सुंदरामन, हितेन कारिया, डॉ प्रवीण जाधव, डॉ.सोफीया आझाद, सुभाषचंद्र मोरे, रतन चावला, विजय शेट्टी, शेखर चंदनखेडे, ॲड. अशोक आडके, बच्चूभाई गाला, संध्या सुंदरामन, से.नि. ब्रिगेडियर अनिल गर्ग, डॉ. अरुण स्वादी, जयेश कुलकर्णी, महाराज बिरमानी आदींचा समावेश आहे. यावेळी असिस्टंट गव्हर्नर साळी यांनी डीजी यांच्या संदेश वाचन केले. नवनिर्वाचित अध्यक्ष राजू कटारे यांनी आपल्या कारकिर्दीत पर्यावरण जनजागृती, आरोग्य व शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबर ग्रामीण भागाच्या विकासासाठी कार्य करणार असल्याचे नमूद केले. यावेळी नूतन सदस्य म्हणून सुप्रसिद्ध बिल्डर राजेंद्र जैन यांचा समावेश करण्यात आला. सुत्रसंचालन डॉ. अरुण स्वादी तर आभार अनिल गर्ग यांनी मानले. पदग्रहण समारंभात क्लबच्या वतीने ग्रामीण भागातील मुलींना शाळेत ये-जा करण्यासाठी प्राथमिक स्वरूपात ५ सायकल इगतपुरी तालुक्यातील निनावी येथील स्व. लोकनेते गोपाळराव गुळवे माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींना प्रदान करण्यात आल्या.

कोटक महिंद्र बँक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: २७ BKC, C 27, G ब्लॉक, बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०००५१
(CIN No. L65110MH1985 PLC038137)
क्षेत्रीय कार्यालय- ॲडमास प्लाझा, सीएसटी रोड,
कोलिवरी रोड, कुंची कुर्ले मार्ग, कालिना, सांताक्रुझ (पूर्वे) मुंबई- ४०००९८ (महा)

लिलावासह विक्रीसाठी जाहीर सूचना

सर्व जनतेस व विशेषत: कर्जदार/सह कर्जदार. जामीनदार यांना याद्वारे ताजी नोटीस (सूचना) देण्यात येत की, खाली दर्शविलेली स्थावर मालमत्ता, जी कोटक महिंद्र बँक लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांस गहाण देण्यात आलेली असून जिचा ताबा कोटक महिंद्र बँक लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे आहे. **तिची ''जेथे आहे जशी आहे'', '' जशी आहे तशी आहे'' आणि '' जे काही आहे''** या तत्वावर विक्री करण्यात येणार आहे. त्याकामी आमचे ई-लिलाव सेवा भागीदार मे. सी.वन.इंडिया प्रा.लि. यांच्या C1 India.com या पोर्टलवर ऑनलाईन बोली लावण्यास खाली सही करणार प्राधिकृत अधिकारी निमंत्रित करीत आहेत. तपशील पुढीलप्रमाणे

कर्ज खाते क्रमांक	LAP17507275, 9011388176
कर्जदार/ जामीनदार/ गहाणदार यांची नावे	**१) कांचन मोटर्स २) सरिता निशांत भुतडा ३) निशांत प्रकाशचंद्र भुतडा ४) प्रकाशचंद्र गंगाबिसन भुतडा ५) कांचन प्रकाशचंद्र भुतडा ६) मॅजिक मोटर्स**
मागणी सूचना तारीख व रक्कम (१३ (२) नोटीस तारीख व रक्कम	**२३-०३-२०१८ व रु.९,७५,८६,६३६.५१ (नऊ कोटी पंच्च्याहत्तर लाख शहाऐंशी हजार सहाशे छत्तीस रुपये पैसे एक्कावन्न फक्त) दि. २३-०३-२०१८ रोजी असलेली**

मालमत्तेचे वर्णन	**राखीव किंमत रु.मध्ये**	**बयाणा रक्कम रु.मध्ये**
प्लॉट क्र.४०८/३बी, कांचन मोटर्स, सर्व्हे क्र.४०८/३बी, कन्नमवार पुलाजवळ, मुंबई-आग्रा रोड, द्वारका, नाशिक. महाराष्ट्र- ४२२००१	**रु.२०,४६,३६,९००/-**	**रु.२,०४,६३,६९०/-**

मालमत्ता परीक्षण वेळ व तारीख	**लिलाव तारीख व वेळ**
दि. ०३-०८-२०२३ सकाळी ११.०० ते १२.०० पर्यंत	**दि.१८-०८-२३ दुपारी २.०० ते ३.०० पर्यंत**

बोली व बयाणा सादर करणेची अंतिम तारीख	**बोली वाढीची रक्कम**
दि.१७-०८-२३ सायं.५ वाजेपर्यंत	**रु.१,००,०००/- (एक लाख रुपये मात्र)**

विक्रीच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती
(१) लिलावाच्या अटी व शर्ती व प्रक्रिया बोलीच्या कागदपत्रांत **(Bid documents)** मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील. बोली लावू इच्छिणाऱ्यांनी आमचे ई-लिलाव सेवा पुरवठादार मे सीवन इंडिया प्रा.लि. यांच्या **https://www.bankeauctions.com** या पोर्टलवरून सुरक्षित स्थावर मालमत्तेचा तपशील आणि ऑनलाईन दाखला केल्या जाणाऱ्या बोली अर्जाची माहिती घ्यावी.
(२) सर्व इच्छुक खरेदीदारांनी/बोलीदारांनी वर उल्लेखिलेल्या वेळ पार्टलवर **https://www.bankeauctions.com** आपली नोंदणी करून स्वत: लिलावात लिलावाचे दिवशी व वेळी सहभागी होण्यासाठी आपला यूझर आयडी व पासवर्ड मोफत तयार करून घ्यावा.
(३) कोणतीही चौकशी, माहिती, प्रक्रियेविषयी प्रशिक्षण आवश्यक असल्यास इच्छुक बोलीदार **मे. सीवन इंडिया प्रा.लि. यांच्या विभागाचे श्री.विनोद चौहान यांचेशी फोन नं. 917291971124, 25, 26,** मोबाईल क्र. **9813887931** व ईमेल आयडी: **delhi@c1india.com** व **support@bankeauctions.com** यावर संपर्क करू शकतील.
(४) प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्राप्त माहितीनुसार या स्थावर मालमत्तेवर ३ वर कोणतेही बोजे नाहीत. तथापि इच्छुक बोलीदारांनी तिच्याविषयी स्वतंत्रपणे चौकशी टायटल/घेणे/अधिकार/ बोजा वगैरे बाबद समाधान करून बोली लावण्यापूर्वी घ्यावे. ही ई-लिलाव जाहिरात कोटक महिंद्र बँक लि.च्या वतीने कोणतेही प्रतिनिधीत्व किंवा खाली मानली जाऊ नये. ही मालमत्ता सर्व ज्ञात/अज्ञात आजच्या भविष्यातील /प्राधिकृत अधिकारी हक्कांचा विचार करून बँकेने विक्रीस काढली आहे. सुरक्षित धनको **(Secured Creditor)** हे तिन्हाईतांच्या कोणत्याही हक्क/घेणे/मागण्यांना बांधील नाहीत.
(५) ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी https://www.bankeauctions.com या वेब पोर्टलवर बिनव्याजी बयाणा रकमेच्या कोटक महिंद्र बंक लिमिटेड मुंबईच्या नावाने काढलेल्या डिमांड ड्राफ्टचा तपशील दाखल करणे आवश्यक आहे. तसेच पॅन कार्ड, आधारकार्ड, निवासी पत्त्याचा पुरावा, कंपनी असल्यास संचालक मंडळ ठराव सर्व स्व साक्षांकित करून सोबत जोडणे आवश्यक आहे.

कर्जदार/गहाणदार/जामीनदार याद्वारे वैधानिक नोटीस देण्यात येते की, **SARFAESI ACT** मधील नियम **6(2), 8(6)** व **9 (1)** प्रमाणे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांत या संबंधीची संपूर्ण देय रक्कम व्याज व खर्चासह भरावी. कसूर असल्यास वरीलप्रमाणे मालमत्तेची विक्री करण्यात येईल. या नोटीसीच्या वृत्तपत्रीय भाषांवर व इंग्रजी मूळ प्रतिमध्ये काही तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी हेच ग्राह्य मानण्यात येईल. कर्जदार/गहाणदार/जामीनदारांनी ही रक्कम तारखेपूर्वी भरून दिल्यास ही प्रक्रिया थांबविण्याची शक्यता आहे.
अधिक तपशील व अटी शर्तीसाठी आमची अधिकृत वेबसाईट **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** किंवा प्राधिकृत अधिकारी **श्री. अशोक मोटवाणी @ 9873737351** ईमेल आयडी: **ashok.motwani@kotak.com** अथवा **श्री. इस्माईल देशमुख @ 8767438253** ईमेल आयडी:**ismail.deshmukh@kotak.com** यांचेशी क्षेत्रीय कार्यालयात संपर्क साधावा.
विशेष सूचना- ई-लिलाव आमचे सेवा पुरवठादार मे. सीवन् इंडिया प्रा.लि. यांचेद्वारे कोटक महिंद्र बँक लिमिटेडच्या वतीने निर्देशित तारखेला करतील. व इच्छुक बोलीदार आपले घर/ कार्यालय/इतर ठिकाणाहून राखीव किंमतीपेक्षा अधिक किंमतीची बोली लावतील. इंटरनेट व इतर साधनांची उपलब्धता ही पूर्णपणे बोली लावणार यांची जबाबदारी राहील. यंत्रणेची तांत्रिक बिघाडाची कोणतीही जबाबदारी मे.सीवन इंडिया प्रा.लि. किंवा कोटक महिंद्र बँक ही स्वीकारणार नाहीत. अशा अचानक शेवटच्या वेळी उद्भवणाऱ्या स्थितीचा विचार करून बोलीदारांनी त्यासाठी जी व्यवस्था/पर्यायी व्यवस्था करून ठेवावी, अशी परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांनी पुरेसे आधीच आपली बोली/सुधारीत वाढीव बोली लावावी, असेही सूचविण्यात येत आहे.

तारीख: ११/०७/२०२३
स्थळ: नाशिक, महाराष्ट्र

सही/-
प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्र बँक लिमिटेड करिता.